Government of Maharashtra

# Government Polytechnic, Pune

(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
University Road, Shivaji Nagar, Pune- 411016

सत्यमेव जयते

**Dr. Vitthal S. Bandal**
B.E.(Electrical) (Gold Medalist)
principal.gppune@dtemaharashtra.gov.in
M.E.(Electrical) Ph.D.(IIT Bombay)
**Principal**

Phone. 020-25676818
Email-

Website- www.gppune.ac.in

दि. 11/11/2020

## विद्यार्थ्यांकरिता महत्वाची सूचना

संदर्भ : १) मा. संचालक तंत्र शिक्षण संचालनालय ,महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे परिपत्रक क्र.१०/एनजीपी /हिवाळी सुट्टी /२०२०/९१८ दि .०९ नोव्हेंबर २०२०.

२) मा. मा. सचिव M.S.B.T.E. यांचे परिपत्रक जा. क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.-२०/२०२०/०८७ दि .०९ नोव्हेंबर २०२०.

३) संस्थेतील सर्व विभागप्रमूख ,कर्मशाळा अधीक्षक व परीक्षा नियंत्रक यांची मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखालील गुगल मीट द्वारे बैठक दि १०/११ /२०२०.

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि संदर्भ क्र. १ मधील मा. संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या परिपत्रकानुसार संस्थेस दि. ११/११/२०२० ते दि.३०/११/२०२० या कालावधीकरिता हिवाळी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे .त्यामुळे दि. ११/११/२०२० ते दि.३०/११/२०२० या कालावधीत ऑनलाईन थेअरी वर्ग होणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

संदर्भ क्र २ मधील मा. सचिव म.रा.तं.शि.मं. यांच्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांची समसत्र-२०१९ करिता बॅकलॉग विषयांची परीक्षा आयोजित करण्यात येत आहे .बॅकलॉग परीक्षा हि फक्त खाली नमूद केलेल्या दोन अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची घेण्यात येईल .

**अट क्र.१ )** नियमित पदविका अभ्यास क्रमातील समसत्र २०१९ ची विषय नोंदणी व सत्रकर्म पूर्ण झाल्यावर १८० क्रेडिट विषयांची व नॉन क्रेडिट विषयांची नोंदणी पूर्ण न झालेले विद्यार्थी .तसेच अंशकालीन पदविका अभ्यास क्रमातील समसत्र २०१९ ची विषय नोंदणी व सत्रकर्म पूर्ण झाल्यावर १८० क्रेडिट विषयांची नोंदणी पूर्ण न झालेले विद्यार्थी.

**अट क्र.२)** अट क्र.१ पूर्ण करणारे व समसत्र २०१९ पूर्वी बॅकलॉग विषय असणारे असे विद्यार्थी कि ज्यांनी समसत्र -२०१९ परीक्षेकरिता बॅकलॉग विषयांची परीक्षा नोंदणी केली आहे .

वरील दोन अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची फक्त समसत्र -२०१९ परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या बॅकलॉग विषयांचीच परीक्षा घेण्यात येईल. समसत्र २०१९ बॅकलॉग परीक्षा खालील कालावधीत घेण्यात येईल.

| अ.क्र. | परीक्षेचे स्वरूप | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा | दि. ०१/१२/२०२० ते दि. ०८/१२/२०२० | Online Examination |
| 2 | सैद्धांतिक (Theory) परीक्षा | दि. १०/१२/२०२० ते दि. २०/१२/२०२० | Online Examination |

प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे वेळापत्रक संबंधित विभाग प्रमुख जाहीर करतील या करिता विद्यार्थ्यांनी आपल्या विभागास संपर्क साधावा.सैद्धांतिक (Theory) परीक्षेचे वेळापत्रक परीक्षा विभागातर्फे दि .०५/१२/२०२० रोजी संस्थेच्या www.gppune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

उपरोक्त प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करून तोंडी पद्धतीने घेण्यात येतील .

बॅकलॉग विषयांच्या लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येतील .

सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादींचा वापर करून सद्यपरिस्थितीत ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्या ठिकाणाहून देऊ शकतात. सदर परीक्षेत १०० गुणांच्या विषयास एकूण ४० प्रश्न व ५० गुणांच्या विषयास एकूण २० प्रश्न असतील. सदर परीक्षेत विद्यर्थ्यांना १०० गुणांच्या विषयास एकूण ४० पैकी ३० प्रश्न व ५० गुणांच्या विषयास एकूण २० पैकी १५ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे .प्रत्येक प्रश्न ०१ गुणाचा असेल व सदर परीक्षेचा कालावधी ०१ तासाचा असेल . प्रत्येक विषयावरील प्रश्न त्या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित असतील.

ज्या विद्यार्थ्यां कडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट ,लॅपटॉप ,मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाही त्यांनी दि. ०३ /१२/२०२० पूर्वी परिक्षा विभागात अर्ज करावा म्हणजे त्यांना परीक्षा देण्याची सुविधा संस्थेत उपलब्ध करून देण्यात येईल.

दिव्यांग विद्यार्थ्यानी परीक्षा विभागात दि .०५/१२/२०२० पर्यंत प्रमाणपत्रासह अर्ज करावा त्यांना नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल.

उपरोक्त परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांनी सर्व बाबींची नोंद घेऊन परीक्षेची तयारी करावी.

11/11/2020

परीक्षा नियंत्रक

शासकीय तंत्रनिकेतन ,पुणे

प्रत :-

१) मा.प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन ,पुणे याना माहितीस्तव सविनय सादर.

२)सर्व विभागप्रमुख याना विनंती कि सदरील सूचना आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

३) MIS प्रभारी याना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेसाठी